ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख ३ एप्रिल, १९५७ | अंक १४

## विविध माहिती

**पोट्टी श्रीरामलू ह्यांचें स्मारक**—आंध्र राज्याच्या निर्मितीसाठी पोट्टी श्रीरामलू ह्यांनीं १९५२ च्या डिसेंबरांत देहांतापर्यंत उपोषण केलें होतें. त्यांचें स्मारक उभारण्याचें आंध्र सरकारनें योजिलें आहे. मद्रासमधील ज्या घरांत त्यांनीं उपवास करून देह ठेवला तें घर विकत घेण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे.

**परिचारिकांच्या शिक्षणाचें केंद्र**— आरोग्यविषयक सार्वजनिक संस्थांतून काम करण्यासाठी परिचारिकांना शिक्षण देण्याचें एक केंद्र राजकोट येथें स्थापन करण्यांत आलें आहे. पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारच्या मंत्र्यांचें कार्यालय ह्या केंद्रासाठी ताब्यांत घेण्यांत आलें आहे. इमारतींत जरूर ते फेरफार करण्यांत आलें आहेत.

**भांडवली मालाची निर्यात**—गेल्या सालच्या पहिल्या नऊ महिन्यांत अमेरिकेनें ३८८·७ कोटी डॉलर्स किंमतीचा भांडवली माल निर्यात केला. अमेरिकेच्या खालोखाल ब्रिटननें २००·३ कोटी डॉलर्स किंमतीचा भांडवली माल निर्यात केला. नवीन बोटींच्या बांधणींतहि ब्रिटनचा जपानच्या खालीं अनुक्रम लागला.

**विद्यापीठांना मदत**—विद्यापीठांनीं व संशोधन संस्थांनीं पुराणेतिहास विषयक उत्खननाचें काम केल्यास त्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के खर्च देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. डेक्कन कॉलेज येथील संशोधनसंस्थेला ५,००० रुपये मिळाले आहेत.

**कापडाचा सांठा तुंबून राहिला**—अहमदाबादमधील दोन गिरण्यांनीं एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यापासून गिरणी बंद करण्यांत येईल अशा नोटिसा लावल्या आहेत. कापडाचा सांठा पडून राहिल्याचें कारण दाखविण्यांत आलें आहे. इंडिअन नॅशनल ट्रेड यूनिअन कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. वसावडा ह्यांनीं दोन्ही गिरण्या सरकारनें ताब्यांत घ्याव्या अशी सूचना केली आहे.

**बँक ताब्यांत घेतली**—इजिप्तच्या सरकारनें इजिप्तमधील बार्क्लेज् बँक व तिच्या सर्व शाखा ह्यांचा ताबा घेतला आहे. ही बँक ब्रिटिश मालकीची आहे. सर्व परदेशी कंपन्या ताब्यांत घेऊन त्यावर ५ वर्षांच्या आंत इजिप्तची संपूर्ण मालकी करण्यांत यावी असा कायदा इजिप्तच्या सरकारनें केलेला आहे.

**काश्मीरमधील विद्युत्केंद्रें**—काश्मीरमध्यें जलप्रवाहाच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारीं दोन केंद्रें उभारण्यांत येणार आहेत. केंद्रांसाठी लागणाऱ्या यंत्रसाहित्याची मागणी भारत सरकारनें हंगेरींतील कारखान्यांकडे नोंदविली आहे. यंत्रसामुग्री उभारण्याचें काम हंगेरीअन तंत्रज्ञच करणार आहेत.

**हिंवतापावर नवा उपचार**—जागतिक आरोग्य संघटनेचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. मिठावर कांहीं विशिष्ट संस्करण करून तें हिंवतापावर उपाय म्हणून वापरतां येईल अशी माहिती अहवालांत देण्यांत आली आहे. अशाप्रकारचें मीठ उपचार म्हणून यशस्वी ठरलें आहे.

**इंडिअन रोडस् कॉंग्रेस**—इंडिअन रोडस् कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन शिलॉंग येथें ता. १२ ते १८ मे पर्यंत भरविण्यांत येणार आहे. त्याचवेळीं रस्त्यासंबंधीं एक प्रदर्शनहि भरविण्यांत येईल. भारताच्या निरनिराळ्या भागांतून सुमारें २५० प्रतिनिधी अधिवेशनासाठी येतील असा अंदाज आहे.

**चित्रकारांना शिष्यवृत्त्या**—चित्रकलेचा उच्च अभ्यास करण्यासाठी ६ चित्रकारांना परदेशीं पाठविण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी त्यांना सरकार शिष्यवृत्त्या देईल. जबलपूर येथें उभारण्यांत आलेल्या शहीद स्मारकावरील चित्रें काढणारे कलावंत श्री. मनोहर सिन्दा ह्यांनाहि एक शिष्यवृत्ति मिळाली आहे.

**औरंगाबाद जिल्ह्याचा विकास**—औरंगाबाद जिल्ह्याचा विकास करण्यासाठी मुंबई सरकारनें एक बोर्ड स्थापन केलें आहे. बोर्डातर्फे मुख्यतः ग्रामीण भागांतील विकासाचीं कामें करण्यांत येतील. बोर्डांत १५ सभासद सरकारी असतील व १६ बिनसरकारी असतील.

**पंजाबमधील नवे कारखाने**—पंजाबमध्यें आणखी कांहीं कारखाने काढण्याचा विचार राज्यसरकारतर्फे विधानसभेंत जाहीर करण्यांत आला. नवीन कारखान्यांत वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचा, दुधाचे पदार्थ तयार करण्याचा व पोलादाच्या वस्तू बनविण्याचा कारखाना असेल. सर्व कारखाने मोठ्या प्रमाणावरील असतील.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि.

### १५१४ मारुतीगल्ली, बेळगांव

दि बँक ऑफ सिटिझन्स लि. बेळगांव या बँकेच्या भागिदारांची २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या मुख्य कचेरीत सोमवार ता. २५।३।५७ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां भरली होती. सभेस सुमारें १०० भागीदार हजर होते.

सभेचें अध्यक्षस्थान बँकेचे चेअरमन श्री. जी. डी. सराफ यांनीं स्वीकारलें होतें.

प्रारंभीं बँकेचे जनरल मॅनेजर यांनीं सभेची नोटीस वाचल्यावर अध्यक्ष श्री. जी. डी. सराफ यांचें खालीलप्रमाणें प्रास्ताविक भाषण झालें.

"ही बँक आतां २१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. आज या बँकेचें भांडवल रु. ४,१२,४७५, राखीव निधी रु. १,०२,१००, एकूण ठेवी रु. २६,२८,९८४ व खेळतें भांडवल रु. ३८,८३,४१९ एवढें आहे. एकंदर खर्च वजा जातां बँकेस ह्या वर्षीं रु. ५,५४३ तोटा झाला आहे; कारण द्यावे केलेल्या कर्जांवरचें व्याज रु. ५,६४६ नफा-तोटा हिशेबांत घेतलें नाहीं. मुदती, ठेवी व सेव्हिंग्ज बँकेमध्यें गेल्या वर्षांपेक्षा रु. १ लाखानें वाढ झाली आहे. यावर्षीं सप्टेंबर १९५६ मध्यें सुरू केलेली नवीन पिग्मी डिपॉझिट स्कीम अल्पावधींत बरीच यशस्वी झाली व तिला लोकांचा व खातेदारांचा चांगलाच पाठिंबा मिळाला याबद्दल मला फार आनंद वाटत आहे व यावरून जनतेचा या बँकेवरील विश्वास वाढत आहे. असें म्हणणेस हरकत नाहीं. या वर्षीं आपल्या बँकेस लायसन्स मिळून ती शिड्यूल्ड होईल अशी मला उमेद आहे. बैलहोंगल व खानापूर येथें स्वतःच्या मालकीच्या बँकेच्या दोन इमारती झाल्या असून लौकरच बेळगांव येथें बँक आपली स्वतःची भव्य इमारत बांधणार आहे. बँका रकमा कर्जाऊ देऊन पैसा तयार करीत असतात. तरी ह्या बँकांचा पैसा नवीन उत्पादन वाढविणेस उपयोगी पडो असें इच्छून मी माझें अल्पसें भाषण पुरें करतों."

त्यानंतर १९५६ सालअखेर ताळेबंदपत्रकाचा ठराव एकमतानें पास झाला. श्री. के. वाय. देशपांडे, श्री. सी. एल. पट्टणशेट्टी व श्री. सी. जी. हेरेकर हे पुन्हां बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर निवडून आले व पुढील सालाकरितां श्री. बी. व्ही. वेरेचकर यांची बँकेचे ऑडिटर म्हणून एकमतानें निवडणूक झाली. चहापान झाल्यावर सभेचें कामकाज संपलें.

त्याच दिवशीं सायंकाळीं बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सभा होऊन श्री. जी. डी. सराफ हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे पुढील वर्षाकरितां चेअरमन म्हणून एकमतानें निवडून आल्याचें जाहीर केलें गेलें.

## "पुढे पाऊल"ला बक्षिस

श्री. श्रीपाद वामन काळे, संपादक "अर्थ", ह्यांच्या "पुढे पाऊल" ह्या नव्या पुस्तकाला महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळानें (डेकन व्हर्नॅक्युलर सोसायटीनें) ४० रुपयांचें बक्षिस देऊन त्याचा पुरस्कार केला आहे. श्री. काळे ह्यांच्या 'कण आणि क्षण' ह्या पुस्तकासहि मंडळानें ३० रुपयांचें बक्षिस दिलें होतें.

पुस्तकाची पृ. सं. १३१ असून किंमत २ रु. आहे.

## जपानमधील भाताच्या लागवडीसाठीं पोटॅशचा उपयोग*

खतांच्या प्रश्नाचा विशेष अभ्यास केलेले जर्मन तज्ञ डॉ. रेमी ह्यांनीं वरील पुस्तिका नुकतीच प्रसिद्ध केली आहे. जपानमध्यें करण्यांत आलेल्या प्रयोगांवरच ती मुख्यतः आधारलेली असली तरी तिचेमधील निष्कर्ष भाताची लागवड करणाऱ्या इतर पौर्वात्य देशांनाहि लागू पडतील. भाताच्या पिकाला नैट्रोजनची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असते व उत्पादनवाढीसाठीं ह्या अन्नाचा पुरवठाहि वाढवावा लागतो. फॉस्फेट खतेंहि मोठ्या प्रमाणावर वापरलीं जातात. परंतु, पोटॅशकडे आजवर पुरेसें लक्ष गेलेलें नव्हतें. डॉ. रेमी ह्यांनीं, पोटॅशमुळें उत्पादनांत वाढ कशी होतें हे दाखविणारे अनुभवसिद्ध तक्ते दिले आहेत. 'पोटॅशचा पुरेसा उपयोग ज्या ठिकाणीं केला गेला, तेथें प्रतिकूल हवामानाचा भाताच्या पिकावर कमी वाईट परिणाम झाल्याचें आढळून आलें. भाताच्या वेगवेगळ्या रोगांबाबतहि प्रयोगांचे निष्कर्ष देण्यांत आले आहेत. भाताच्या लागवडीसाठीं पोटॅशचा उपयोग करण्याचें महत्त्व जपानी शेतकऱ्यांना अधिकाधिक पटूं लागलें आहे, असें दिसतें.

* "Paddy Rice Production and Potash Fartilizers in Japan." लेखकः—Dr. W. Remy. Verlagsgesellschaft für Ackerbau M. B. H. Hanover, Germany.

## राष्ट्रभाषा प्रचारसमिति, वर्धा ह्या संस्थेच्या पुढील परीक्षा

राष्ट्रभाषा-प्रचार समिति, वर्धा-द्वारा-संचालित "राष्ट्रभाषा प्रारंभिक" ते "राष्ट्रभाषा-रत्न" पर्यंतच्या आगामी परीक्षा सर्व राज्यांत ता. २१ सप्टेंबर, १९५७ ला होतील.

"परिचय," "कोविद," व "राष्ट्रभाषा-रत्न" परीक्षेस सीधे बसूं इच्छिणारांनीं ता. २२ जून, १९५७ पर्यंत केंद्र-व्यवस्थापकांमार्फत वर्ध्यास आधीं अर्ज पाठवून स्वीकृति मिळवून घ्यावी.

शुल्क-सहित आवेदन-पत्रें ता. ४ ऑगस्ट, १९५७ च्या आंत केंद्र-व्यवस्थापकांकडे दिलीं पाहिजेत, असें महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचारसमितीचे संचालक, श्री. पं. मु. डांगरे हे कळवितात.

## इंडियन बँक्स असोसिएशन

### नवें कार्यकारी मंडळ

इंडियन बँक्स असोसिएशनची वार्षिक सभा नुकतीच भरली, त्यावेळीं नव्या वर्षाकरितां खालीलप्रमाणें निवडणुका झाल्याः—

चेअरमन : श्री. सी. एच. भाभा (सेंट्रल बँक ऑफ इंडिया)

डेप्युटी चेअरमन : श्री. डी. आर थॉम (बँक ऑफ इंडिया)

ऑनररी सेक्रेटरी : श्री. एस. एल. कोठारी (बँक ऑफ जयपूर)

कमिटीचे इतर सभासद : श्री. एन्. एम्. चोक्सी (बँक ऑफ बरोडा), श्री. एम्. आर. रुया (यु. कमर्शि. बँक), श्री. कमल नयन बजाज (पंजाब नॅ. बँक), श्री. एस. कृष्णस्वामी अय्यंगार (इंडियन बँक), श्री. संजीवन बानर्जी (युनायटेड बँक ऑफ इंडिया), श्री. पी. व्ही. गांधी (देना बँक), श्री. एफ. के. एफ. नरिमन (युनियन बँक ऑफ इंडिया) श्री. एन्. के. करंजिया (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) व श्री. सी. एकनाथ कामत (कॅनरा बँक).

# अर्थ

बुधवार, ता. ३ एप्रिल, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कापडगिरण्यांबाबतचें धोरण बदला

बेंगॉल मिलओनर्स असोसिएशनची २३ वी सर्वसाधारण वार्षिक सभा कलकत्ता येथें भरली होती. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. ए. के. मितर ह्यांनीं आपल्या भाषणांत कापड-गिरण्यांच्या बाबतींत सरकारनें जें धोरण स्वीकारलें आहे, त्याचा फेरविचार करावा अशी मागणी केली. ते म्हणाले कीं वास्तव परिस्थितीचा विचार करून सरकारनें गिरण्यांवर घातलेलीं बंधनें ढिलीं केलीं पाहिजेत. ह्या धंद्याला प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे. तरीसुद्धां कापडाच्या गिरण्यांनीं उत्पादनाचा उच्चांक गांठला आहे. देशाला लागणाऱ्या कापडाची निर्मिती वाजवी किंमतींत करण्याची संधि गिरण्यांना देण्यांत आली पाहिजे. त्यासाठीं गिरण्यांचा विस्तार करूं देणें योग्य होईल. पण हें करण्याऐवजीं सरकार गिरण्यांना अधिक फायदा झालेला आहे असें गृहीत धरून आपलेंच उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर कापडावर अतिशय जाचक असा अबकारी कर बसविण्यांत आला असून त्यामुळें कापडाचा खप घटला आहे. सध्या बाजारांतील उलाढाली मंदावल्या आहेत. गिरण्या व व्यापारी ह्यांच्याजवळील कापडाचे सांठेहि वाढत चालले आहेत. कापडाला गिऱ्हाईक कमी आहे, लोकांजवळ फारसा पैसा नाहीं, कापसाच्या किंमतींत वाढ झालेली आहे. ह्या कारणांमुळें सध्यांची अडचणीची परिस्थिति निर्माण झालेली आहे. कमी प्राप्तीच्या लोकांची कापडाची गरज भागवावयाची असेल, तर कापडाच्या गिरण्यांचा विकास समतोल पद्धतीनें करण्यांत आला पाहिजे.

---

## भारत व अमेरिकेचें खाजगी भांडवल

अमेरिकेच्या व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ भारताच्या दौऱ्यावर आहे. भारतांत अमेरिकेंतील खाजगी भांडवल गुंत-विण्यास कितपत वाव आहे ह्यासंबंधीं पहाणी करण्याचें काम मंडळ करीत आहे. ह्यासंबंधीं पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत प्रतिनिधिमंडळाचे नेते, मि. प्रेस्टन फोर्बस ह्यांनीं पुढील विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं परदेशीं भांडवल गुंतविण्या-पूर्वीं अमेरिकन भांडवलदार मुख्यत: तीन गोष्टींचा विचार करतो. (१) भांडवलावर नफ्याचा दर काय सुटेल, (२) धंद्याच्या विस्ताराला कितपत संधि आहे आणि (३) गुंतविलेलें भांडवल सुरक्षित आहे कीं नाहीं. अमेरिकन भांडवलदाराला शक्यतोंवर भांडवलाची दीर्घकालीन गुंतवणूक पसंत पडते. ह्या दृष्टीनें विचार करतां भारत व अमेरिका ह्यांच्यांतील व्यापारी संबंध वाढविण्याची चांगली संधि आहे अशी त्यांना खात्री वाटते. द्वितिय पंचवार्षिक योजना पार पाडण्यासाठीं परदेशीय भांडवल आकृष्ट करण्याचा भारत सरकारचा मानस आहे. म्हणून उभयतां देशांच्या दरम्यान असलेलें संशयाचें धुकें स्वच्छ करण्याचा मंडळाचा हेतु आहे. संशयाचें वातावरण निवळलें म्हणजे अमेरिकन कंपन्या आणि भारतामधील कंपन्या ह्यांच्या दरम्यान व्यापारी संबंध प्रस्थापित करणें सुलभ जाईल. असें सहकार्य होण्याच्या मार्गांत अमेरिकनांच्या दृष्टीनें दोन अडथळे आहेत. पहिली अडचण दुबार कर वसूल होण्याची व दुसरी पुढे-मागें केव्हां तरी धंद्यांचें राष्ट्रीयीकरण होण्याची शक्यता. ह्या अडचणी असल्या तरी भारताचें राजकीय स्थैर्य लक्षांत भरण्यासारखें आहे.

---

## साबणाच्या कारखान्याचा विस्तार

म्हैसूरच्या सरकारनें ३९ वर्षांपूर्वीं काढलेल्या साबणाच्या कार-खान्याचा विस्तार करण्यांत आला आहे. कारखान्याची जागाहि आतां बदलण्यांत आली असून बंगलोर शहरांतील नव्यानें वसविण्यांत आलेल्या राजाजी नगरमध्यें तो हलविण्यांत आला आहे. कारखान्याच्या विस्तारासाठीं १६ लाख रुपये खर्च आला आहे. ह्या प्रसंगीं करण्यांत आलेल्या समारंभांत भाषण करतांना म्हैसूरचे गव्हर्नर महाराजा वाडिआर म्हणाले कीं, भारतांतील लोकांना रोज स्नान करण्याची संवय आहे. तरीसुद्धां देशांतील दरमाणशीं साबणाच्या खपाचें प्रमाण अगदीं कमी, म्हणजे अवघें १ पौंड आहे. ब्रिटनमध्यें हें प्रमाण २३ पौंड आहे, जपानमध्यें २४ पौंड आहे आणि अमेरिकेंत २९ पौंड आहे. स्वच्छता हा केवळ सौंदर्याचाच भाग आहे असें नाहीं. मानसिक व शारीरिक आरोग्यहि त्यावर अवलंबून आहे. ही गोष्ट जनतेला जसजशी समजूं लागेल तसतशी साबणाच्या खपांत वाढ होत जाईल ह्यांत शंका नाहीं. म्हणूनच साबण ह्या वस्तूची बाजारपेठ एकसारखी वाढत जाणारी असणार. त्यांतहि अल्प किंमतीच्या व आल्हाद-दायक अशा प्रकारचे साबण तर नेहमींच मागणींत राहातील. म्हैसूरचा कारखाना हा प्रथमपासूनच अतिशय कार्यक्षमतेनें चालविला जात होता. त्यामुळें त्याची एकसारखी भरभराटच होत गेली. कारखान्यांतील उत्पादन वाढत्या प्रमाणावर होत गेलें. आज ह्या कारखान्यांत दरसाल ६०० टन साबण तयार करण्यांत येतो. जगाच्या बाजारपेठेंत स्थान टिकवावयाचें असेल तर चांगल्या प्रतीचा साबण वाजवी किंमतींत देतां आला पाहिजे

---

## सर विल्यम जॉन जेंकिन्स

मुंबई सरकारचे १० (वर्षें १९३७ ते १९४७) ॲग्रिकल्चरल कमिशनर, सर विल्यम जॉन जेंकिन्स, हे आपल्या वयाच्या ६४ व्या वर्षीं इंग्लंडमध्यें मृत्यु पावले.

---

## सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन

सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशनच्या डायरेक्टर बोर्डानें प्रत्येकी १,००० रुपयांचे १ लक्ष शेअर्स विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे. अर्जाबरोबर १०० रु. व अर्जमंजुरीनंतर १०० रु. भरा-वयाचें आहेत.

## हातमागाच्या कापडासाठी परदेशीय बाजारपेठा

आंध्र राज्यांतील हातमाग विणकरांच्या काँग्रेसनें राज्यांतील हातमागाच्या धंद्याविषयीं अहवाल तयार करून तो राज्याच्या मुख्य मंत्र्यांकडे पाठविला आहे. हातमागाच्या धंद्याच्या सध्यांच्या अडचणींचें वर्णन करतांना अहवालांत पुढील प्रमाणें माहिती देण्यांत आली आहे. आंध्र हातमाग विणकरांच्या सहकारी सोसायटीजवळ तयार कापडाचा प्रचंड सांठा पडून आहे. सुमारें ३६ लाख रुपये किंमतीचें कापड गिऱ्हाइकांच्या अभावीं साठून राहिलें आहे. सोसायटीला दैनंदिन व्यवहार चालविण्यासाठी लागणारा पैसा कापडाच्या विक्रीच्या अभावीं मिळत नाहीं. त्याचप्रमाणें कर्ज मिळण्याचीहि शक्यता आतां राहिलेली नाहीं. प्राथमिक सहकारी सोसायट्यांजवळहि कापडाचा सांठा तुंबून राहिला आहे. त्यामुळें त्यांना आपल्या सभासदांना कामें पुरवितां येत नाहींत. जे विणकर सहकारी संस्थांचे सभासद नाहींत त्यांची अवस्था तर अधिकच बिकट आहे. हातमागाच्या मालकांजवळील भांडवल कापडाच्या सांठ्यांत अडकून पडलें असल्यामुळें तेहि आपल्या कामगारांना रोजगार देऊं शकत नाहींत. ह्याच वेळीं अन्नधान्याच्या व विणकरांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती भडकत चालल्या आहेत, त्यामुळें विणकरांची दुर्दशा अधिकच तीव्र झाली आहे. सांठलेल्या कापडाला परदेशी बाजारपेठा हुडकून काढण्यासाठी राज्य सरकारनें एखादें मंडळ नेमून त्याला परदेशांच्या दौऱ्यावर पाठवावें. पश्चिम आफ्रिका, मध्यपूर्व, अतिपूर्व, ह्या भागांत भारतामधील हातमागाच्या कापडाला गिऱ्हाईक मिळतें कां, याचा शोध मंडळानें करावा.

## कापसाच्या लागवडींत ३ टक्के वाढ

भारतांत १९५६-५७ मध्यें १,८०,८४,००० एकर विभागांत कापसाची लागवड होऊन ४०,८४,००० गांसड्या ( एक गांसडी ३९२ रत्तलांची ) उत्पादन झालें असावें असा मध्यवर्ति अन्न व शेतकी खात्याच्या अर्थ व आंकडेवारी विभागाचा या पिकाबाबतचा तिसरा अंदाज आहे. गतवर्षींचे हे आंकडे १,७५,५३,००० एकर व ३३,८२,००० गासड्या असें होतें. यावरून गतवर्षीपेक्षा यंदा लागवडींत ५,३१,००० एकर अथवा ३ टक्के, तसेंच कपाशीच्या उत्पादनांत २०·८ टक्के वाढ अपेक्षित आहे.

तसेंच यंदा सरकीचें उत्पादन १४,२९,००० टन व्हावें. गतवर्षीचा आंकडा ११,८४,००० टन होता. यावरून यंदा सरकीच्या उत्पादनांत २,४५,००० टन अथवा २०·७ टक्के वाढ अपेक्षित आहे.

कापसाच्या उत्पादनांतील वाढ, बिहार व म्हैसूर राज्यें वगळतां, बहुतेक सर्व राज्यांत विशेषतः मुंबई, मध्यप्रदेश व पंजाब राज्यांत झाली असून तिला कांहीं अंशीं लागवडीच्या क्षेत्रांतील वाढ तर कांहीं अंशीं पेरणीच्या वेळचें अनुकूल हवामान कारणीभूत आहे.

कापसाच्या निरनिराळ्या जातींचा विचार करतां अमेरिकन्स, जारीला, भडोच-विजय व सुरती-सुयोग जातींच्या उत्पादनांत वाढ, तर माळवी व उमरा जातींच्या उत्पादनांत घट झाली आहे. ही वाढ मुख्यतः मध्यम व लांब धाग्याच्या कापसांत झाली आहे.

**बुद्धविषयक चित्रपटाची निवड**—कॅनेस येथें ता. २ मे ते १७ मेपर्यंत आंतरराष्ट्रीय चित्रपट-महोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. भगवान् गौतम बुद्धाच्या जीवनासंबंधीं विमल रॉय ह्यांनीं तयार केलेला 'गौतम बुद्ध' हा चित्रपट महोत्सवांत दाखविण्यासाठी निवडण्यांत आला आहे.

## पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक : चेकच्या बाबतींत आणखी कांहीं सवलती

अल्प बचतीस अधिक चालना देण्यासाठी म्हणून १६ जुलै १९५६ पासून मुंबई जी. पी. ओ. येथील पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत चेकनें पैसे काढतां येण्याची पद्धति चालू करण्यांत आली. तथापि, चेक पद्धतीचें खातें असण्यासाठी खात्यांत किमान ५०० रु. शिल्लक असावी लागे व अशा खात्यासाठी वार्षिक २ रु. प्रासंगिक खर्चासाठी द्यावे लागत.

परंतु चेकच्या ह्या सोयीचा लाभ अधिक जनतेला घेतां यावा म्हणून तत्संबंधींच्या अटींत आणखी कांहीं सवलती जाहीर करण्यांत येत आहेत. आतां अशा खात्यांत ५०० रु. ऐवजीं २५० रु. शिल्लक असावी लागेल. वार्षिक २ रु. हा आकार अजिबात रद्द करण्यांत आला आहे. ही सवलत देण्यांत आल्याकारणानें आतां जी. पी. ओ. मधील ह्या सवलतीचा लाभ जनता अधिक प्रमाणांत घेईल, अशी अपेक्षा आहे.

---

**पोस्टऑफिसांची संख्या**— १९५६-५७ सालच्या पहिल्या ९ महिन्यांत भारतांत १,३९१ नवीं पोस्टऑफिसें उघडण्यांत आलीं. आतां पोस्टऑफिसांची एकूण संख्या ५६,४३३ झाली आहे. त्याशिवाय मार्च, १९५७ अखेर आणखी २,०२६ नवीन पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं. गेल्या वर्षी पोस्ट खात्यानें सुमारें ३२३ कोटी वस्तूंची देवघेव केली.

**खताच्या कारखान्याचें उत्पादन**—सिंद्री येथील खतांच्या कारखान्यांत १९५६ सालीं ३,३१,००० टन अमोनिअम सल्फेटचें उत्पादन करण्यांत आलें. त्यापूर्वीच्या वर्षीच्या उत्पादनाचा आकडा ३,२१,००० टन इतका होता. १९५८ च्या अखेर कारखान्यामधील खताचें उत्पादन ६० टक्क्यांनीं वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**शेतकऱ्यांना उपदेश**—दिल्ली येथें ऑल इंडिआ फार्मर्स कौन्सिलची तिसरी बैठक भरली होती. बैठकीला देशाच्या निरनिराळ्या भागांतून २,००० शेतकरी आले होते. भारताचे अर्थमंत्री, श्री. कृष्णमाचारी ह्यांनीं त्यांना असा उपदेश केला कीं प्रत्येक खेड्यानें व शेतकरी कुटुंबानें आपली स्वतःची अशी एक योजना तयार करावी.

**गौहत्ती येथें नवें रेडिओ स्टेशन**—गौहत्ती येथें रेडिओचें नवे स्टेशन उघडण्यांत येणार आहे. रेडिओ केंद्रावरून ७ एप्रिलपासून कार्यक्रमांच्या ध्वनिक्षेपणाला प्रारंभ होईल. केंद्र १० किलोवॅट शक्तीचें असून त्यावरून भारताच्या ईशान्य कोपऱ्यांतील आसाम, मणिपूर व त्रिपुरा ह्या भागांतील लोकांना कार्यक्रम ऐकविले जातील. नागा टोळ्यांच्यासाठी खास कार्यक्रम ध्वनिक्षेपित केले जातील.

**मेहेरबानांचे भत्ते बंद**—ग्वाल्हेरच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशननें मेयर, डेप्युटी मेयर व स्टॅंडिंग कमिटीचे सभासद ह्यांना देण्यांत येणारे भत्ते बंद करण्याचा निर्णय एकमतानें घेतला आहे. १९५७-५८ सालच्या कॉर्पोरेशनच्या अंदाजपत्रकांत ह्या भत्याच्या खर्चासाठी म्हणून ५,४०० रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. मेयरांना दरमहा २०० रुपये भत्ता देण्यांत यावयाचा होता.

## दि बेळगांव बँक लि. ची वार्षिक सभा

चेअरमन, श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल बी., ह्यांचें भाषण

दि बेळगांव बँक लि., बेळगांव या बँकेच्या ता. २६-३-५७ रोजीं भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्यें अध्यक्ष श्री. गोविंदराव सराफ यांनीं केलेलें अध्यक्षीय भाषण:—

अहवालाचें साल हें बहुतेक सर्व बँकांना वाढत्या नफ्याचें गेलें असून आमच्या बँकेसहि चांगला नफा झाल्याचें ताळेबंदावरून आपण पाहिलेंच आहे. मागील सालीं आमच्या बँकेस माल-तारणाचीं कर्जें नेहमींप्रमाणें मिळूं शकलीं नसल्यानें नफ्यामध्यें घट दिसून आली होती, तीं या सालीं भरून निघून निव्वळ नफ्याचें प्रमाण वाढीस लागलें आहे. मोठ्या बँकांनीं औद्योगिक कर्जें देण्याचें धोरण स्वीकारलें असलें तरी आम्हांस हंगामशीर मालावरच कर्जें देणें इष्ट वाटतें. कारण, या भागांत औद्योगिक प्रगति त्या प्रमाणांत झालेली नाहीं. औद्योगिक कर्जें जास्त व्याज मिळवत असलीं तरी वेळेवर परत येत नाहींत. चालू सालीं धान्य व इतर आवश्यक वस्तूंचे भाव सारखे तेजीतच राहून व्यापारी वर्गासहि भरपूर फायदा झाला. परंतु राहणीचें मान बरेंच महागाईचें झालें आहे. या वर्षांत धान्यांचे शेंकडा दरांत ३१·२ टक्क्यांनीं वाढ झाली व एकंदर मान शेंकडा १८·४% पर्यंत वाढलें. शेतीचें उत्पन्न घटल्यामुळें वाढत्या धान्याचे भावास आळा घालण्यासाठीं सरकारला स्वस्त धान्याचीं दुकानें पुन्हां उघडावीं लागलीं. औद्योगिक उत्पादनांत चांगलीच वाढ झाली तरी कापडाच्या उत्पादनावरील निर्बंधाचे धोरणामुळें कापडगिरण्यांची व जनतेचीहि बरीच कुचंबणा झाली. हातमागाचे धंद्यास मात्र उत्तम उत्तेजन व सवलती वाढत्या प्रमाणांत मिळून विणकरवर्गास चांगले दिवस आले आहेत. श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या राजीनाम्यानंतर श्री. कृष्णम्माचारी यांचेकडे फडणिशी खातें आल्यामुळें या वर्गास आणखी सवलती मिळणें शक्य झालें व औद्योगिक कंपन्यांच्या किफायत शक्तीस आळा घालण्याचे नवे नवे उपाय अवलंबण्यांत येऊं लागले व अनपेक्षितपणें जादा बजेट आणून मोंडवली नफ्यावर कर बसविण्यांत आला.

या वर्षांतील राजकीयदृष्ट्या महत्त्वाची घटना म्हणजे ता. १ नोव्हेंबर १९५६ रोजीं पुनर्रचनेच्या योजनेनुसार नवीन चौदा राज्यें अस्तित्वांत आलीं. भारताच्या नकाशांतून उरलेलीं देशी संस्थानें कायमचीं काढून टाकण्यांत आलीं. मुंबई राज्य सर्वांत मोठें होऊन आपला बेळगांव जिल्हा म्हैसूर राज्यांत घालण्यांत आला. याविरुद्ध या जिल्ह्यांतील मराठी भागांत बरीच नेटाची चळवळ होऊन, तीव्र असंतोषाचे परिणाम व्यापारावर झाले. सरहद्दीच्या भागांत भाषिक चळवळीमुळें नेहमींच अस्थिर वातावरण निर्माण होत असतें. झोनल कौंसिलच्या नेमणुकीमुळें आतां हा प्रश्न कायमचा समाधानकारक सुटेल अशी आशा निर्माण झाली आहे. म्हैसूर राज्यांत मुंबई सरकारच्या नव्या कुळकायद्याच्या जमिनींची मालकी १ एप्रिल १९५७ पासून कुळाकडे जाण्याचा अंमल स्थगित करण्यांत आल्यानें मध्यमवर्गीयांवरील गंडांतर तूर्त टळलें आहे. वर्षअखेरीस पाकिस्ताननें काश्मीर प्रश्न यूनोपुढें आणून उभय देशांमधील संबंध तेढीचे केल्यामुळें एकंदरींत आर्थिक स्थितींत घबराट निर्माण झाली व त्याचे परिणाम शेअरबाजारावर चांगलेच दिसून आले. त्यापूर्वी शेअरबाजारांत वर्षभर चांगलीच तेजी होत गेली. सुएझच्या प्रश्नामुळें सैनिकी आक्रमणास सुरुवात होऊन सुएझचा कालवा वाहतुकीस बंद झाला. यामुळें आयात-निर्यातींत चांगलाच अडथळा निर्माण होऊन पंचवार्षिक योजनेच्या पूर्ततेंतहि नव्या अडचणी निर्माण झाल्या. तथापि आतां ही परिस्थिति सुधारत आहे.

बँकिंगच्या दृष्टीनें आहवालाचे सालांत: कर्जामध्यें बरीच म्हणजे १६५ कोटींची वाढ दिसून आली. परंतु त्या मानानें ठेवींमध्यें मात्र वाढ होत नसल्याचें दिसून येत आहे. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत फक्त ७४ कोटींनींच वाढ झाली आहे. पैशाच्या पुरवठ्यांत मात्र १३२ कोटींची वाढ झाली व त्यामुळें दुसऱ्या सहामाहींत बँकांवर बराच ताण पडला. अल्प मुदतीच्या ठेवीवरील व्याज ४% पर्यंत द्यावें लागलें. ही तंगीची परिस्थिति सुधारण्याचे दृष्टीनें विचार करण्यासाठी वर्षअखेरीस केंद्रीय अर्थमंत्र्यांना प्रमुख बँकर्सची परिषद बोलवावी लागली. औद्योगिक कर्जांची वाढती मागणी, वाढत्या आयातीसाठी जादा पैसा, पंचवार्षिक योजनेचा खर्च, सरकारी कर्जें व प्रमुख कंपन्यांकडून नव्या शेअरभांडवलाची मागणी, यामुळें हा ताण वाढतच गेला.

आपल्या बँकेकडील ठेवींत वर्षअखेर अजमासें चार लक्षांची वाढ दिसून येते. ता. १८ नोव्हेंबर रोजींचे ठेवीचे आकडे पाहिल्यास ही वाढ १७ लक्ष रुपयांची होती असें दिसून येतें. हंगाम सुरू झाल्यावर व्यापारी ठेवीदारांनीं रकमा उचलल्यामुळें ही झालेली घट स्वाभाविक आहे असें म्हणावें लागेल. कांहीं ठिकाणीं वर्षअखेरीस मुद्दाम जास्तींत जास्त ठेवी तात्पुरत्या मिळवून दाखविण्याची प्रथा अवलंबिली जाते त्यापेक्षा ही स्वाभाविक स्थिति जास्त मजबुतीची वाटते. कर्जाचें प्रमाण ७०% पर्यंत गेलें होतें तरी वर्षअखेरीस इतर बँकांचे मानानें आपली तरती स्थिति चांगल्या प्रकारची होती असें दिसून येईल. डिव्हिडंडमध्येंहि १½% बोनसरूपानें वाढ करण्यांत आली असून नोकरवर्गालाहि एक महिन्याच्या पगाराइतका बोनस देण्यांत आला आहे. पगाराचा व इतर व्यवस्थेचा वाढता खर्च लक्षांत घेतां व तसेंच शाखांच्या विस्तारामुळें होणारा नेहमींचा जादा खर्च लक्षांत घेतां किफायत शक्ति मजबुतीची वाटते. १५ ऑगस्ट रोजीं बार्शी येथें २४ वी शाखा सुरू करण्यांत आली आहे.

ग्रामीण विभागांत नव्या शाखा काढण्याच्या स्टेट बँकेच्या योजनेनुसार आतांपर्यंत त्यांच्या एकूण ६६ नव्या शाखा उघडण्यांत आल्या, त्यांपैकी ५८ शाखा ज्या ठिकाणीं दुसऱ्या बँका काम करीत आहेत अशाच ठिकाणीं उघडण्यांत आल्या असून फक्त ८ शाखा बँक मुळींच नसलेल्या ठिकाणीं काढलेल्या आहेत. या ५८ शाखांपैकी आपल्या शाखा असलेल्या कांहीं ठिकाणीं या शाखा उघडलेल्या आहेत. स्टेट बँकेच्या वार्षिक सभेच्या वेळीं चेअरमन श्री. अभ्यंगार यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें कीं, दुसऱ्या बँकांशीं स्पर्धा न करण्याचें धोरणच आम्हीं अवलंबिलें आहे. सरकारी ट्रेझरी असलेल्या ठिकाणच्या स्टेट बँकेच्या शाखांमुळें पैशाच्या पुरवठ्याची सोय होत असली तरी इतर नेहमींचा व्यवहार न करण्याचें किंवा करणेचा असल्यास तेथील बँकांमार्फत करण्याचें निश्चित धोरण स्वीकारल्याशिवाय स्पर्धेचें वातावरण साहजिकच राहणार आहे. विशेषत: अलीकडे ठेवी मिळविण्याबाबत या बँकेकडून जाहीर व व्यक्तिगत नेटानें प्रयत्न होत आहेत. या बँकेंत ठेवींवरील व्याजाचे दरहि इतर बँकांप्रमाणेंच ठेवण्यांत येत आहेत. यावरून ठेवींसाठी निश्चित स्पर्धा करण्याचें धोरण स्पष्ट होत आहे. सध्यां बँकांना ठेवींबाबत खुद्द सरकारकडूनच मुख्य स्पर्धा होत आहे, यांत शंका नाहीं.

अल्प बचतयोजनेमुळें यंदा ५७ कोटींपेक्षा जास्त रक्कम सरकारला मिळाली आहे. मात्र याबरोबर या ठेवीचा पैसा इतर बँकांप्रमाणें निश्चितपणें ठेवीदारांच्या हितसंवर्धनाचे दृष्टीनें खर्च करण्याचें परिणामकारक बंधन सरकारवर घालणें शक्य होत नाहीं. इंडिअन बँक्स असोशिएशनचे अध्यक्ष श्री. भाभा यांनीं याबाबत केलेली तक्रार विचारार्ह आहे. ठेवींच्या या वाढत्या पैशामुळें सरकारी खर्चाचें प्रमाण बेसुमार वाढत आहे. रिझर्व्ह बँकेनें बिलांवरी व्याजाचे दर व स्टँपड्यूटीमध्यें वाढ केल्यामुळें बँकांच्या खर्चांत वाढ होत चालली आहे. त्या मानानें बँकांना कर्जावरील व्याजाचे दरांत वाढ करणें शक्य होत नाहीं. या सर्व गोष्टींचा परिणाम बँकांचे कायमचे खर्च वाढण्यांत होत आहे. एस्टॅब्लिशमेंट खर्च व रोख नफा यांत अलीकडे ५२% वरून ५५·८४% पर्यंत वाढ झाल्याचें दिसून येतें.

याचबरोबर नवीन कंपनी कायदा यंदाच अंमलांत आल्यामुळें बँकांवर व्यावहारिक व तांत्रिक अशा बऱ्याच अडचणींचा बोजा निर्माण होत आहे. बँकिंग कंपन्यांच्या दुरुस्त कायद्यामुळेंहि जाचक बंधनें लादण्यांत आलीं आहेत. यामुळें सदोष कारभार असलेल्या बँकांपेक्षा सुव्यवस्थित व सचोटीचा कारभार असलेल्या बँकांनाच जास्त त्रास होऊन त्यांची कल्पक व विधायक शक्ति खर्ची होत असल्याचें दिसून येतें. यासालीं ३८ लहान बँकांना लायसेन्स नाकारल्यामुळें व्यवहार बंद करावे लागले. शेड्यूल्ड बँकांचे संख्येंत मात्र घट झालेली नाहीं.

ग्रामीण विभागांत कार्य करण्यासाठी सरकारनें केवळ को-ऑपरेटिव्ह संस्थांवरच अवलंबून न राहतां कार्यक्षम अशा इतर बँकिंग कंपन्यांनाहि तशा सवलती देऊन वाव दिल्यास सरकारी योजना लवकर फलद्रूप होतील असा आम्हांला विश्वास वाटतो. तरी यासाठी इतर बँकांनाहि संधि द्यावी अशी सरकारला आग्रहाची विनंती आहे. या बाबतींत मद्रास युनिव्हर्सिटीचे रीसर्च प्रोफेसर डॉ. गोपाळ यांनीं जाहीर केलेलें मत विचारार्ह आहे.

ता. २७-१-५७ रोजीं स्टाफसाठी रिक्रिएशन क्लब उघडण्यांत आला आहे, हें सांगण्यास आनंद वाटतो. शेअरहोल्डर्स, ठेवीदार व स्टाफ यांनीं सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानून रजा घेतों.

---

**पेन्शनरांना तात्पुरती मदत**—मद्रास सरकारनें एक हुकूम काढून ज्या पेन्शनरांना १०० रुपये अगर त्यापेक्षा कमी पेन्शन् असेल त्यांना ६ रुपये अधिक देण्याचें ठरविलें आहे. ही मदत तात्पुरती आहे. अशाच तऱ्हेचा हुकूम सरकारनें १९४८ मध्यें काढला होता.

**कृत्रिम रबराचा कारखाना**—भारतांत काढण्यांत येणारा कृत्रिम रबराचा कारखाना नैसर्गिक रबराच्या निर्मितीच्या मार्गांतील धोंड ठरणार नाहीं अशी माहिति लोकसभेंत देण्यांत आली. १९६५ च्या सुमारास भारतामधील रबराची मागणी ५०,००० टनांच्या आसपास असेल, पण नैसर्गिक रबराचें उत्पादन ३०,००० टनापर्यंतच असेल, असा हिशेब सांगण्यांत आला.

**हिंदी शास्त्रज्ञांना शिक्षण**—अमेरिकेंतील ॲरॅगॉन नॅशनल लॅबोरेटरी ह्या संस्थेंत तीन भारतीय शास्त्रज्ञांना अणुविज्ञानाचें शिक्षण देण्यांत येत आहे. अमेरिकेच्या अणुशक्ती मंडळानें अणुशक्तीचा शांतताकालीन उपयोग करण्यासाठी संशोधन-केंद्र म्हणून वरील संस्था चालविली आहे.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

स्थापना : ४ सप्टेंबर, १९१७

दिनांक १ जानेवारी १९५७ पासून कायम ठेवीचे व्याजाचे दर वाढविले आहेत.

| मुदत | पूर्वींचा दर | नवा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | २ | $२\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | $२\frac{1}{2}$ | $२\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | – | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३ | $३\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | ४ | ४ टक्के |

या बँकेतील ठेवी मुख्यतः सहकारी शेतकी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठींच वापरल्या जातात.

अधिक माहिती पत्रद्वारें अगर समक्ष आनंदानें पुरवूं.

बा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सांगली बँक लि.

**सांगली.**

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# दशमान नाणेंपद्धतीचा अवलंब

## रूपांतराचे दर

नव्या नाण्यापैकीं, एक, दोन, पांच व दहा नये पैसे हीं नाणीं दि. १ पासून प्रचारांत आलीं आहेत. दिलेल्या आणे पैंतील रकमेच्या बदल्यांत नये पैसे नेमके किती मिळतील हाच प्रश्न सर्वसाधारण माणसास बुचकळयांत टाकणारा आहे. आणखी सुमारें तीन वर्षेपर्यंत जुनीं व नवीं अशीं दोन्हीं प्रकारचीं नाणीं कायदेशीर चलन राहणार आहेत.

नव्या नाणेंपद्धतींत रुपयाचें मूल्य आहे तेंच राहील. परंतु सध्यां रुपयाचे ६४ पैसे किंवा १९२ पया मिळतात त्याऐवजीं १०० नये पैसे मिळतील. आठ आणे व चार आणे हीं नाणीं अनुक्रमें ५० व २५ नया पैशांबरोबर असून, तशीं तीं सर्व कामांसाठी वापरतां येतील.

पुढील तक्त्यांतील पहिल्या स्तंभांत आज प्रचारांत येत असलेलीं नवीं नाणीं दिलेलीं असून, दुसऱ्या स्तंभांत त्यांचीं अचूक सममूल्यें तर तिसऱ्या स्तंभांत ज्यांची जागा नवीं नाणीं घेतील तीं चालू नाणीं दिलेलीं आहेत.

| नया पैसा | अचूक सममूल्य | चालू नाणीं |
|---|---|---|
| १ नया पैसा | १·९२ पै | १ पैसा |
| २ नये पैसे | ३·८४ पया | २ पैसे |
| ५ नये पैसे | ९·६० पया | १ आणा |
| १० नये पैसे | एक आणा व ७·२० पया | २ आणे |

चालू नाण्यांत एक, दोन, पांच व दहा नया पैशांचीं नेमकीं सममूल्य नाणीं नाहींत हें वरील तक्त्यावरून स्पष्टपणें समजून येतें.

१ एप्रिल, १९५७ रोजीं सर्वच नवीं नाणीं प्रचारांत येणार नाहींत. फक्त नया पैसा व २, ५ आणि १० नये पैसे हीं नवीं नाणीं प्राचारांत येत आहेत. उरलेलीं म्हणजे २५, ५० नये पैसे व नवा रुपया (१०० नये पैसे) हीं नाणीं मागाहून प्रचारांत येतील.

नवीं नाणीं जसजशीं अधिकाधिक वापरांत येतील तसतशीं जुनीं नाणीं काढून घेतलीं जातील. चालू नाणीं चलनांतून काढून घेण्यास तीन वर्षे लागतील असा अंदाज आहे, संक्रमणाच्या या काळांत नव्या व जुन्या नाण्यांच्या रूपांतराच्या दरांची माहिती असणें जरूरीचें आहे.

रूपांतराच्या दरांची जनतेस चांगल्या प्रकारें माहिती व्हावी म्हणून मध्यवर्ती अर्थखात्यानें एक रुपयापर्यंतच्या रकमेच्या रूपांतर दराचे दोन तक्ते तयार करून सर्वत्र वाटलें आहेत. याशिवाय वृत्तपत्रांतून व नियतकालिकांमधून तें प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

यापैकी सुलभ तक्ता क्र. १ मध्यें १ पै पासून १ रुपयापर्यंत रकमेचे रूपांतराचे दर दाखविण्यांत आलेले आहेत. हा तक्ता मुख्यतः १ एप्रिल, १९५७रोजीं बुक बॅलन्सेसच्या रूपांतरासाठीच वापरावयाचा आहे.

प्रत्यक्ष व्यवहारांत नाण्यांची देवघेव होईल त्याचवेळीं रूपांतराचा तक्ता वापरावयाचा आहे. इतर प्रसंगीं रूपांतराची आवश्यकता पडेल तेव्हां दशमान नाण्यांत बरोबर रकम शोधून काढण्यांत यावी. असें करतांना नया पैशाचा भाग राहिल्यास तो पूर्ण करण्यांत येऊन त्यानुसार पैसे यावे-द्यावेत.

हीच गोष्ट करण्याचा दुसरा एक सोपा मार्ग असा. चालू चलनांत एकूण रकमेचा हिशेब करून पूर्ण रुपयांचा भाग वगळल्यास चालू चलनांतील उरलेल्या भागाची रूपांतर तक्त्यावरून दशमान नाण्यांत रकम शोधून काढावी.

३ व ४ पैचें २ नया पैशांत रूपांतर करतां येतें. पैसे देणारास ४ पै देणें भाग पाडतां येणार नाहीं. १९२ पयांचे १०० नये पैसे या दरांत दोन नया पैशांत ४ पै हें सगळ्यांत नजिकचें सममूल्य आहे. परंतु अशा प्रसंगीं ३ पैच याव्या लागतील. दि इंडियन कॉइनेज (अमेंडमेंट) ॲक्ट १९५५ या कायद्याच्या कलम १४ (२) मध्यें दिलेला आंकडा करण्याच्या तत्त्वानुसार २ नये पैसे बरोबर ३ पै पडतील.

यावरून अशाप्रसंगीं विशेषतः प्राथमिक अवस्थांत कांहींशीं नुकसानी होईल. परंतु मोठ्या संख्येनें नवीं नाणीं वापारांत येऊं लागल्यानंतर ही नुकसानी कमी होण्याची अपेक्षा आहे.

एका वेळीं चार आणे किंमतीच्या चालू नाण्यांची किंवा त्याच्या पटींतील नाण्यांची अदलाबदल करतां येईल. या व्यवहारांत मात्र कोणाचाहि तोटा होणार नाहीं.

१ एप्रिल, १९५७ पासून नाणीं बदलून घेण्याची सोय सर्व ठिकाणच्या ट्रेझरी, सब ट्रेझरी कचेऱ्या, रिझर्व्ह बँकेच्या, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या, स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या व बँक ऑफ म्हैसूरच्या सर्व कचेऱ्यांत करण्यांत आली आहे.

किंमती कोठल्याहि चलनांत—नव्या वा जुन्या—ठरविल्या तरी दोन्ही प्रकारचीं नाणीं एकाचवेळीं कायदेशीर चलन म्हणून चालणार असल्यानें नाणीं बदलून घेण्यासाठी उपरोक्त कचेऱ्यांवर गर्दी करण्याचें कारण नाहीं.

### रूपांतरचा तक्ता

आणे पैंत दिलेल्या रकमांचें नया पैशांतील सममूल्य रूपांतराच्या तक्त्यांत दिलेलें आहे. (अलिकडेच दुरुस्ती केलेल्या १९०६ च्या इंडियन कॉइनेज ॲक्टांतील १४ (२) कलमांत नमूद केलेल्या पद्धतीनुसार अपूर्ण अंकाचें पूर्णांक करण्यांत आलें आहेत.) १०० नया पैशांचा एक रुपया या हिशेबानें बदलून घ्यावयाच्या रकमेचें नया पैशांतील अचूक सममूल्य पूर्णांकांत काढतांना अर्धा नया पैसा किंवा त्याखालील भाग सोडून दिला असून अर्ध्या नया पैशांहून अधिक असलेला भाग १ नया पैसा धरलेला आहे.


बँकांसाठी खास नव्या नाण्यांतील

**भारत रेकनर**

लेखक : श्री. बी. आर. वर्तक, डायरेक्टर, बँक ऑफ औंध लि., सातारा.

पुरस्कार : श्री. व्ही. पी. वर्दे, मॅनेजिंग डायरेक्टर, दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुस्तकाचें मुख्य वैशिष्ट्य—

सेव्हिंग्ज खात्यावरील व्याज आकारणीचे तक्ते

[ कोणत्याहि रेकनरमध्यें हे तक्ते दिलेले नाहींत ]

किंमत ६ रु. पोस्ट खर्च : ८७ नये पैसे (१४ आणे)

प्रशान्त प्रकाशन, टिळक रोड, पुणें २.

## रूपांतराचा तक्ता

**कोणत्याहि व्यवहारांत आणे पैंत किंमत असतां त्या रकमेचे नया पैशांतील सममूल्य**

| चालू नाण्यांतील रकम | नया पैशांतील सममूल्य | चालू नाण्यांतील रकम | नया पैशांतील सममूल्य |
|---|---|---|---|
| १. | २. | १. | २. |
| आणे पै | | आणे पै | |
| ० ३ | २ | ८ ३ | ५२ |
| ० ६ | ३ | ८ ६ | ५३ |
| ० ९ | ५ | ८ ९ | ५५ |
| १ आणा | ६ | ९ आणे | ५६ |
| १ ३ | ८ | ९ ३ | ५८ |
| १ ६ | ९ | ९ ६ | ५९ |
| १ ९ | ११ | ९ ९ | ६१ |
| २ आणे | १२ | १० आणे | ६२ |
| २ ३ | १४ | १० ३ | ६४ |
| २ ६ | १६ | १० ६ | ६६ |
| २ ९ | १७ | १० ९ | ६७ |
| ३ आणे | १९ | ११ आणे | ६९ |
| ३ ३ | २० | ११ ३ | ७० |
| ३ ६ | २२ | ११ ६ | ७२ |
| ३ ९ | २३ | ११ ९ | ७३ |
| ४ आणे | २५ | १२ आणे | ७५ |
| ४ ३ | २७ | १२ ३ | ७७ |
| ४ ६ | २८ | १२ ६ | ७८ |
| ४ ९ | ३० | १२ ९ | ८० |
| ५ आणे | ३१ | १३ आणे | ८१ |
| ५ ३ | ३३ | १३ ३ | ८३ |
| ५ ६ | ३४ | १३ ६ | ८४ |
| ५ ९ | ३६ | १३ ९ | ८६ |
| ६ आणे | ३७ | १४ आणे | ८७ |
| ६ ३ | ३९ | १४ ३ | ८९ |
| ६ ६ | ४१ | १४ ६ | ९१ |
| ६ ९ | ४२ | १४ ९ | ९२ |
| ७ आणे | ४४ | १५ आणे | ९४ |
| ७ ३ | ४५ | १५ ३ | ९५ |
| ७ ६ | ४७ | १५ ६ | ९७ |
| ७ ९ | ४८ | १५ ९ | ९८ |
| ८ आणे | ५० | १६ आणे | १०० |

तुम्हांस पैसे द्यावयाचे असल्यास वा मोड देतांना नया पैशांत, चालू नाण्यांत अगर दोन्ही नाण्यांत देऊं शकता.

व्यवहार पुरा झाल्यावर फक्त आणे पैमधील रकम नया पैशांत किती होते हें पाहण्यासाठी रूपांतर तक्ता वापरावा.

**ब्रिटिश विमानांची निर्यात**—१९५६ सालीं ब्रिटनमधील विमानांच्या कारखान्यांनीं १० कोटी पौंड किंमतीचीं विमानें परदेशांत निर्यात केलीं. दुसऱ्या महायुद्धानंतर झालेली हानि भरून काढून विमानांच्या उत्पादनांत झपाट्यानें वाढ करण्यांत आली. आतां ह्या बाबतींत ब्रिटन अमेरिकेशीं जोराची स्पर्धा करूं शकतें.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,१४,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ६५,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९३४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

**शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.**

अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ७७,०००

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.